# डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.
# (मल्टी स्टेट शेड्यूल्ड बँक)

## दि. 24 सप्टेंबर, 2022 रोजी झालेल्या 52 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

डोंबिवली नागरी सहकारी बँकेची 52 वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. 24 सप्टेंबर, 2022 रोजी सकाळी 9.30 वाजता सावित्रीबाई फुले कला मंदिर, एम्.आय्.डी.सी,डोंबिवली (पूर्व) येथे योजली होती. गणसंख्येअभावी वार्षिक सभा अर्ध्या तासासाठी तहकूब करण्यात आली. गणसंख्येची पूर्तता होईपर्यंत संचालकांनी तसेच व्यवस्थापन मंडळातील सदस्यांनी आपला परिचय करून दिला. गणसंख्येची पूर्तता होताच सभा सुरू करण्यात आली.

सभेच्या प्रारंभी मा. अध्यक्ष श्री. गणेश धारगळकर यांनी प्रास्ताविक केले. आपल्या प्रास्ताविकात अहवाल वर्ष 2021-22 मधील बँकेच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेतला. त्याचप्रमाणे चालू आर्थिक वर्षातील कर्ज वसुली, कर्ज वसुलीसाठी दाखल केलेले दावे, निर्लेखित कर्ज खात्यांमधील कर्ज वसुली इ. ची माहितीही मा. अध्यक्षांनी दिली. त्याचप्रमाणे भाषणाच्या अनुषंगाने सादरीकरणही केले.

प्रास्ताविकानंतर सभेच्या कामकाजास सुरूवात झाली. सरव्यवस्थापक श्री. रमेश सिंग साहेब यांनी सभेची सूचना वाचून दाखविली. तद् नंतर मा. अध्यक्षांनी मा.संचालक चार्टर्ड अकाउंटट श्री. अभिजित मराठे यांना विषय क्रमांक 1 ची मांडणी करण्यास सांगितले.

**<u>विषय क्रमांक 1</u>**- संचालक मंडळाने सादर केलेला दि. 31-03-2022 अखेरच्या वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक तसेच नफा वाटणी मंजूर करणे आणि वैधानिक लेखापरीक्षकांच्या अहवालाची नोंद घेणे.

या विषयाची मांडणी मा. संचालक सी.ए.श्री.मराठे यांनी केली. कोविडच्या प्रभावामुळे अहवाल वर्षात बँकेचा व्यवसाय कमी झाल्याचे त्यांनी सांगितले. मोठ्या ठेवींवरील (Bulk Deposit) व्याजदर नियंत्रित केल्याने गतवर्षीपेक्षा बँकेच्या ठेवी ₹ 133कोटींनी कमी झाल्या. त्याचप्रमाणे विशिष्ट क्षेत्राला करावयाच्या कर्ज पुरवठ्यावरही स्वमर्यादा घालून घेतल्यामुळेही गतवर्षीच्या तुलनेत कर्ज व्यवहारही ₹ 503 कोटींनी कमी झाला. असे असले तरी कासा ठेवींचे प्रमाण 40.52% वर आहे. तसेच निर्लेखित कर्जांमध्येही ₹ 38.45 कोटींची कर्ज वसुली करण्यात आपल्याला यश मिळालं.

बाजारातील मंदीमुळेच उद्योग व्यवसायांवर परिणाम झाला. त्यामुळे थकीत कर्जांचे प्रमाणही वाढते राहीले. तरी देखील विविध कायदेशीर उपाययोजना करून आपण प्रभावी कर्ज वसुली केली, त्यामुळे ढोबळ अनुत्पादीत कर्जांचे प्रमाण आपण 6% राखू शकलो. नक्त अनुत्पादीत कर्जांचे प्रमाण 4.10% आहे. कर्ज व्यवहार कमी झाल्यामुळे कर्जावरील उत्पन्न कमी झाले. परंतू त्याचवेळी व्याजदर नियंत्रित ठेवल्यामुळे ठेवींवर द्याव्या लागणा-या व्याजातही घट झाली. तसेच कर्मचारी महासंघाबरोबर झालेल्या वेतन कराराचाही परिणाम उत्पन्नावर झाला. त्यामुळे ह्यावर्षी पहिल्यांदाच निव्वळ नफा गतवर्षीपेक्षा कमी झाला आहे. बहुराज्यीय सहकारी कायदा व रिझर्व्ह बँकेच्या निर्देशास अधीन राहून निव्वळ नफ्याचे वितरण प्रस्तावित केले आहे. रिझर्व्ह बँकेच्या अनुमतीस अधीन राहून सभासदांना 7% व प्राध्यान्य क्रमाच्या सभासदांना 7.25% लाभांश देण्यास शिफारस करत आहोत.

ह्या अहवाल वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण मे. किर्तने अँड पंडित या नामांकित फर्मने केले आहे. त्यांनी दिलेला लेखा परिक्षण अहवाल वार्षिक अहवालात पान क्रमांक 30 वर प्रसिध्द केला आहे. ह्यावर्षीही कोणताही वाईट शेरा नसलेला, चांगला अहवाल त्यांनी दिला आहे.

या विषयावरील काही प्रश्न असतील तर अवश्य विचारावेत, त्या प्रश्नांची उत्तरे माझे सहकारी मा. संचालक सी. ए.श्री. शेलार यांनी द्यावीत अशी मी विनंती करतो.

एक सभासद – कासा म्हणजे काय ?

सी.ए.श्री. शेलार – कासा म्हणजे करंट अकाऊंट, सेव्हिंग अकाउंट. यामध्ये झालेली ठेवींची वाढ बँकेसाठी चांगली असते.

श्री. सुधाकर वाघमारे – लाभांश देण्याबाबत रिझर्व्ह बँकेचे निकष काय आहेत ?

सी.ए. श्री. शेलार – लाभांशाच्या रूपाने, निव्वळ नफ्याच्या 33% पेक्षा अधिक रक्कम अदा करू नये असे रिझर्व्ह बँकेचे सर्वसाधारण संकेत आहेत. आपण अदा करत असलेल्या लाभांशाचे प्रमाण 40% आहे.

एक सभासद – नफा कमी होण्याचे कारण काय ?

सी.ए.श्री.शेलार – उद्योगधंद्यावर आलेली मंदी. थकीत कर्जांचे वाढलेले प्रमाण, तसेच गुंतवणूकीतील कमी झालेल्या संधी व कमी झालेला कर्ज व्यवहार यामुळे नफा कमी झाला आहे.

एक सभासद – कर्ज वसुलीसाठी काय प्रयत्न केले ?

सी.ए.श्री.शेलार – आर्बिट्रेटरकडे दावे दाखल केले जातात. तसेच सरफेसी कायद्याखाली नोटीस देऊन मालमत्तांची जप्ती व त्यांची विक्री करून वसुली केली जाते. त्याचबरोबर कर्जदार व जामीनदारांचे समुपदेशन करूनही थकीत कर्ज वसुली केली जाते.

श्री. पाटील – सायबर हल्ल्यामुळे ग्राहकांचे वैयक्तिक नुकसान नाही झाले परंतू सभासदांचे नुकसान झाले आहे. त्याबाबत थोडक्यात निवेदन करावे.

मा. संचालक श्री.वाळुंजकर यांनी याबाबत निवेदन केले.

रिझर्व्ह बँकेच्या माहिती तंत्रज्ञान विषयक निर्देशांप्रमाणे आपली बँक टायर II मध्ये येते. त्यानुसार RBIT म्हणजेच रिझर्व्ह बँकेच्या माहिती तंत्रज्ञान विषयक अधिका-यांनी दि. 11 मार्च रोजीच आपल्या बँकेची तपासणी केली होती. तांत्रिक विषयात सर्व बाबी योग्य असल्याचा निर्वाळा त्यांनी केला होता.परंतू दि. 12 मार्च रोजी बँकेवर सायबर हल्ला झाला,त्यामुळे ग्राहकांच्या वैयक्तिक खात्यातून रक्कम गेलेली नसली, त्यांच नुकसान झालं नसलं तरी बँकेचे पैसे गेले आहेत. परिणामी सभासदांचं नुकसान झालं आहे. हे खरंच आहे. त्या हल्ल्यानंतर ज्या त्रुटी आढळल्या त्याची पूर्तता आपण केली आहे. याबाबत पोलिसांकडे तसेच सायबर क्राईम विभागाकडेही तक्रार दाखल केली असून, त्याचा पाठपुरावा आपण करत आहोत. परत असे होऊ नये म्हणून सर्व प्रकारची काळजी आपण घेत आहोत. सायबर इन्शुरन्स करण्याचा विचारही आपण करत आहोत.

उपरोक्त विषयी अन्य काही शंका / प्रश्न नाहीत याची खात्री करून मा. संचालक सी.ए.श्री. शेलार यांनी पुढील ठराव मांडला.

**<u>ठराव क्रमांक -1</u>** दि. 31-03-2022 रोजी संपलेल्या वर्षाचा, संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल आणि लेखापरीक्षकांनी तपासलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रक ही सर्वसाधारण सभा स्वीकृत करत आहे.

संचालक मंडळाने वार्षिक अहवालात सुचविल्याप्रमाणे, एकूण नफ्याचे वितरण करण्यास आणि भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मंजूरीस अधीन राहून, सर्वसाधारण भाग-भांडवलावर कमाल 7 टक्के व प्राधान्यक्रमाच्या भाग-भांडवलावर (म्हणजे प्रेफरन्स शेअर्सवर) कमाल 7.25 टक्के दराने लाभांश देण्यास ही वार्षिक सर्वसाधारण सभा मंजूरी देत आहे.

तसेच, वैधानिक लेखापरीक्षकांनी सन 2021-22 या आर्थिक वर्षासाठी दिलेल्या बँकेच्या हिशेब तपासणी अहवालाची, ही सभा नोंद घेत आहे.

सूचक – श्री. अशोक एल. बागाईतकर(सभासद क्र. 46480)

अनुमोदक – श्री. प्रभाकर माणकलाल पितळे (सभासद क्र. 39463)

ठराव एकमताने मंजूर.

**<u>विषय क्रमांक 2</u>** – सन 2020-2021 या आर्थिक वर्षाचा दोष दुरूस्ती अहवाल (Compliance Report) सादर करण्यात आल्याची नोंद घेणे.

मा.संचालक श्री. योगेश चौधरी यांनी हा विषय मांडताना सांगितले, दोष दुरूस्ती पूर्तता अहवाल मा. केंद्रीय सहकार आयुक्तांच्या कार्यालयात दि. 23-11-2021 रोजी सादर केला आहे. दोष दुरूस्ती अहवालात कोणत्याही गंभीर स्वरूपाच्या चुका आढळल्या नव्हत्या. तसेच सर्व त्रुटींची पूर्तता झाल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

याविषयी कोणाचीही शंका / प्रश्न नाहीत याची खात्री करून मा. संचालक श्री. चौधरी यांनी पुढील ठराव मांडला.

ठराव क्रमांक -2 सन 2020-21 या आर्थिक वर्षासाठीच्या हिशेब तपासणी अहवालाचा दोष-दुरुस्ती अहवाल (Compliance Report) केंद्रीय सहकार विभागाकडे दिनांक 23-11-2021 रोजी सादर झाला आहे. सदरच्या कार्यवाहीची ही सभा नोंद घेत आहे.

सूचक – श्री. अशोक हेमराज शाह (सभासद क्र. 49553)

अनुमोदक – श्री. भावेश वेलजी मारू (सभासद क्र. 72616)

ठराव एकमताने मंजूर.

**<u>विषय क्रमांक 3 –</u>** आर्थिक वर्ष 2022-23 करीताच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.

या विषयाची मांडणी सरव्यवस्थापक श्री. रमेश सिंग यांनी केली. अंदाजपत्रक मांडताना रिटेल कर्ज व्यवहारांवर बँकेचा भर राहिल असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच कामकाजात सुधारणा करून, नफा वाढीसाठी प्रयत्न जातील, बँकेचा मिश्र व्यवसाय ₹ 6792 कोटींपर्यंत पोहोचेल असेही त्यांनी सांगितले.

याविषयी कोणाचीही शंका / प्रश्न नाहीत याची खात्री करून सरव्यवस्थापक श्री. सिंग यांनी पुढील ठराव मांडला.

**<u>ठराव क्रमांक 3-</u>** सन 2022-23 या आर्थिक वर्षासाठी संचालक मंडळाने मंजूर केलेल्या बँकेच्या अंदाजपत्रकास ही वार्षिक सर्वसाधारण सभा मंजूरी देत आहे.

सूचक – श्री. अनिल जनार्दन सरदेसाइ (सभासद क्र. 51240)
अनुमोदक – श्री. कैलास विष्णू शुक्ल (सभासद क्र. 107138)

ठराव एकमताने मंजूर.

**<u>विषय क्रमांक 4 –</u>** संचालक मंडळाने मंजूर केलेली बँकेची दीर्घकालीन योजना (Long Term Perspective Plan) सभेपुढे सादर करणे.

मा. उपाध्यक्षा सौ.कुलकर्णी यांनी या विषयाची मांडणी करतानाच पुढील आशयाचा ठराव मांडला.

**<u>ठराव क्रमांक 4</u>** - बँकेची दीर्घकालीन योजना खालीलप्रमाणे आहे.

(1) नविन शाखा शक्यतो महाराष्ट्रातील कमी स्पर्धेच्या मध्यम/ छोट्या शहरात / गावांमध्ये सुरु करणे.

(2) दरवर्षी सुमारे Double Digit Growth **( 10 %** व्यवसायवृध्दी**).**

(3) **Internet Banking** सेवा सुरु करणे.

(4) आर्थिक वर्ष 2025-26 पर्यंत ₹ 8,500**/**-कोटींचा व्यवसायाचा टप्पा गाठणे.

ही वार्षिक सर्वसाधारण सभा या दीर्घकालीन योजनेस मंजूरी देत आहे.

सूचक – श्री. महेश मुंगी (सभासद क्र. 112346)
अनुमोदक – श्री. मनोहर रा. अत्तरदे (सभासद क्र. 100208)

ठराव एकमताने मंजूर.

**<u>विषय क्रमांक 5</u>** -संचालक मंडळाने आर्थिक वर्ष 2022-23 साठी मंजूर केलेली वार्षिक योजना ( Annual Operational Plan) सभेपुढे सादर करणे.

मा. उपाध्यक्षा सौ.कुलकर्णी यांनी या विषयाची मांडणी केली. गेल्या आर्थिक वर्षात 19000 बचत खाती आपल्या बँकेत उघडली गेली. म्हणूनच ह्यावर्षी 20000 बचत खाती नव्याने सुरू करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवल्याचे त्यांनी सांगितले.

एक सभासद – सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांची खाती आपल्या बँकेत उघडता येतात का? जिल्हा मध्यवर्ती बँकेतच खातं असावं अशी अट आहे का ?

सौ. कुलकर्णी - अजिबात नाही. आपल्या बँकेत सहकारी सोसायटीची खाती उघडता येतात. अनेक सहकारी सोसायटींची खाती आपल्या बँकेत आहेत. फक्त सिंकींग फंडच्या रक्कमेचे खाते जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत ठेवण्याची काळजी आपण घ्यावी.

अन्य काही प्रश्न नसल्याने सौ. कुलकर्णी यांनी पुढील ठराव मांडला.

**<u>ठराव क्रमांक 5</u>** –आर्थिक वर्ष 2022-23 साठी संचालक मंडळाने मंजूर केलेली बँकेची वार्षिक योजना खालीलप्रमाणे आहे.

(1) बचत खात्यांची संख्या सुमारे 20,000 ने वाढविणे.
चालू खात्यांची संख्या सुमारे 1,500 ने वाढविणे.
CASA ठेवींचे प्रमाण 2% ने वाढविणे.

(2) Gross NPA व NET NPA चे प्रमाण कमी करणे.

बँकेची वार्षिक सभा या वार्षिक योजनेला मंजूरी देत आहे.
सूचक – श्री. विवेक व्ही. देहाडराय (सभासद क्र. 100046)
अनुमोदक – श्री. योगेश शंकर मराठे (सभासद क्र. 59251)
ठराव एकमताने मंजूर.

**<u>विषय क्रमांक 6 –</u>** बँकेच्या पोटनियम क्रमांक 10 मधील तरतुदींची पूर्तता न करणा-या सभासदांचे सभासदत्व रद्द करणे.

या विषयाची मांडणी मा. संचालिका ॲड. सौ. आंबेकर यांनी केली. 2013 मध्ये झालेल्या घटना दुरूस्तीप्रमाणे तसेच बँकेच्या पोटनियमात झालेल्या बदलांप्रमाणे ज्यांचे भाग-भांडवल ₹ 1,500/- पेक्षा कमी आहेत. अशा सभासदांचे सभासदत्त्व रद्द करून त्यांचे भाग भांडवल परत करावे असा विषय त्यांनी मांडला.

श्री. राजेश सिंग – मला अशी कोणतीही सूचना मिळालेली नाही.

सौ. आंबेकर – याविषयी आपण वार्षिक सभेच्या प्रत्येक सूचनेत, तसेच वार्षिक अहवालात याबाबत उल्लेख केलेला आहे. तसेच याबाबत वृत्तपत्रातही आपण जाहिरात दिली होती व शाखेच्या बाहेरील सूचना फलकावरही माहिती दिली होती.

श्री. ढोकळे – असे किती सभासद आहेत ? आणि त्याची भाग भांडवलाची रक्कम किती आहे? त्या रक्कमेचे आपण काय करणार ?

सौ. आंबेकर – असे एकूण 27886 सभासद आहेत व भाग-भांडवलाची रक्कम सुमारे ₹1.50 कोटी आहे. ती रक्कम संबंधित सभासदाला परत देणार.

श्री. कर्वे – आज ठराव केला म्हणजे सभासदत्त्व उद्या रद्द होणार नाही. त्यासाठी काही प्रक्रिया करावी लागणार आहे आणि अशा सभासदांचे सभासदत्त्व रद्द व्हावे अशी बँकेची अजिबात इच्छा नाही. परंतू कायद्याचे पालन करावेच लागते. दरवर्षी रिझर्व्ह बँकेचे तपासणी अधिकारी याबाबत विचारणा करत असतात, शेरा मारत असतात आणि ज्यांना आपले सभासदत्त्व टिकवून ठेवायचे आहे त्यांनी उर्वरित रक्कम अवश्य भरावी. आपल्याही परिचित कोणी असेल त्यांचेकडूनही ₹ 1,500/- पर्यंतचे भाग-भांडवल पूर्ण करून घ्यावे त्यांचे सभासदत्त्व रद्द होणार नाही.

एक सभासद – अशा सभासदांना आपण भरपूर मुदत दिली आहे. भाग-भांडवलाची पूर्तता न करणा-या सभासदांचे सभासदत्व रद्द करावे.

याविषयी अन्य काही शंका / प्रश्न शिल्लक नसल्याने सौ. आंबेकर यांनी पुढील ठराव मांडला.

**<u>ठराव क्रमांक 6</u>** - बँकेच्या पोटनियम क्रमांक 10 मधील तरतुदींची पूर्तता न करणा-या (किमान 30 भाग, म्हणजेच किमान भाग-भांडवल रक्कम रु. 1,500/- धारण न केलेल्या) सभासदांचे सभासदत्व रद्द करण्यात यावे व त्यांची भाग-भांडवलाची रक्कम परत करण्यात यावी.
सूचक – श्री. नीलय अशोक शाह (सभासद क्र. 85270)
अनुमोदक - श्री. हेमंत व्ही. मारू (सभासद क्र. 72615)
ठराव एकमताने मंजूर.

**<u>विषय क्रमांक 7 –</u>** बँकेचे संचालक तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या बँकेत कार्यरत असलेल्या नातेवाईकांबाबत माहिती घेणे.

याविषयाची मांडणी मा. संचालक श्री. खरपडे यांनी केली. बहुराज्यीय सहकारी कायदा 2002 च्या कलम 39(1) (एल) मधील तरतुदींप्रमाणे बँकेच्या सेवेत कार्यरत असलेल्या मुख्य कार्यकारी अधिकारी (सरव्यवस्थापक) यांचे कोणीही नातेवाईक बँकेच्या सेवेत नसल्याची माहिती त्यांनी सभेस दिली. परंती बँकेतील एका संचालकांचे मेहुणे श्री. सुळे – उपसरव्यवस्थापक हे गेली 30 वर्षे बँकेच्या सेवेत कार्यरत असल्याचे त्यांनी विदीत केले. उपस्थितांनी याविषयी कोणतीही शंका उपस्थित केली नाही. श्री. खरपडे यांनी पुढील ठराव सभेपुढे सादर केला.

**ठराव क्रमांक 7** – बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिका-याचे कोणीही नातेवाईक बँकेचे कर्मचारी म्हणून कार्यरत नाहीत.
विद्यमान संचालक मंडळातील एका मा. संचालकांचे एक नातेवाईक पूर्वीपासूनच बँकेच्या सेवेत आहेत, याची ही सभा नोंद घेत आहे.
सूचक – श्री. तातोजी दत्ताराम साटम (सभासद क्र. 68128)
अनुमोदक – श्री. निलेश मनोहर सारंग (सभासद क्र. 87661)

ठराव एकमताने मंजूर.

मा. संचालिका सौ. आंबेकर यांनी पुढील विषय सभेपुढे ठेवला.

**विषय क्रमांक 8 –** संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरुस्तीस मान्यता देणे.
संचालक मंडळाने बँकेच्या पोटनियमात काही दुरुस्ती/ बदल प्रस्तावित केले आहेत. याबाबत सभेच्या सूचनेत उल्लेख केला असून त्याचे सविस्तर विवरण वार्षिक अहवालात केले आहे. त्याबाबतची माहिती मा. संचालिका सौ. आंबेकर यांनी सभेस दिली. त्या अनुषंगाने त्यांनी पुढील ठराव सभेपुढे मांडला.

**ठराव क्रमांक 8-** बँकेच्या पोटनियम क्र. 6(iv), 6(xi), 12(1)(iv), 29 आणि 35(A), (B), (C), (D)(E) व (F) मधील दुरुस्ती/ बदल/ वाढ यास ही वार्षिक सर्वसाधारण सभा मंजूरी देत आहे.

सूचक – श्री. आदित्य केतकर (सभासद क्र. 93367)
अनुमोदक – श्री. मकरंद हरी मेहेंदळे (सभासद क्र. 3051)

ठराव एकमताने मंजूर

यानंतरच्या विषयाबाबतची माहिती मा. संचालिका सौ. पेंढरकर यांनी सभेस दिली.

**विषय क्रमांक 9 –**बँकेच्या संचालकांनी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी रिझर्व्ह बँकेच्या मास्टर सर्क्युलरमधील सूचनांचा अंगीकार केला असल्याची नोंद घेणे / माहिती देणे.

मा. संचालिका सौ. पेंढरकर यांनी बँकेच्या संचालकांनी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सूचनांचा अंगिकार केला असल्याचे सभेस सांगितले. बहुराज्यीय सहकारी कायदा 2002 च्या कलम 39 (1) (एन) मधील तरतुदींप्रमाणे पुढील ठराव मांडत असल्याचे सांगितले.

**ठराव क्रमांक 9 –** भारतीय रिझर्व्ह बँकेने सहकारी बँकांच्या संचालकांसाठी DCBR.BPD.(PCB/ RCB) Cir No. 2, Dt. 01-07-2015 या मास्टर सर्क्युलरद्वारे मार्गदर्शक सूचना (Do's & Don't) जारी केल्या आहेत. डोंबिवली नागरी सहकारी बँकेच्या संचालकांनी मास्टर सर्क्युलरमधील सूचनांचा अंगीकार केला असल्याची ही सभा नोंद घेत आहे.

सहकारी बँकांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (सरव्यवस्थापक) यांचेसाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने दि.25 जून 2018 रोजी निश्चित केलेले निकष (Fit & Proper Criteria) सूचित केले आहेत. तसेच बँकेच्या पोटनियम क्रमांक 35 व 36 मध्येही त्यांचे अधिकार व कर्तव्ये इत्यादी निश्चित केले आहे. या दोन्ही बाबी सरव्यवस्थापकांना लागू केल्या आहेत. त्याची ही सभा नोंद घेत आहे. त्याचप्रमाणे बँकेने, अधिकारी तसेच कर्मचा-यांसाठी स्थायी आदेश तयार केले असून त्याची नोंदणी कामगार आयुक्त, ठाणे जिल्हा(Labor Commissioner Office, Thane) यांचेकडे केली आहे. त्याचीही ही सभा नोंद घेत आहे.
सूचक – श्रीमती मनिषा महेंद्र लखोटे (सभासद क्र. 63585)
अनुमोदक – श्री. प्रशांत बा. मुळे (सभासद क्र. 40544)

ठराव एकमताने मंजूर

यानंतर मा. संचालक श्री. वाळुंजकर यांनी पुढील विषय सभेपुढे सादर केला.

**विषय क्रमांक 10** – संचालकांना व त्यांच्या कुटुंबियांना (मुदत ठेवींच्या तारणावर) दिलेल्या कर्जांच्या तपशीलाची नोंद घेणे.
याबाबत माहिती देताना श्री. वाळुंजकर यांनी सांगितले की, रिझर्व्ह बँकेने सहकारी बँकांना जे निर्देश दिले आहेत, त्यानुसार सहकारी बँकेच्या संचालक व त्यांच्या कुटुंबियांनी त्याच बँकेतून विमा पॉलिसी अथवा त्यांच्या स्वतःच्या मुदत ठेवींच्या तारणावरील कर्जांखेरीज कोणतेही अन्य कर्ज घेतलेले असू नये.
बहुराज्यीय सहकारी कायदा 2002 मधील कलम 39(3) प्रमाणे संचालकांना व त्यांच्या कुटुंबियांना दिलेल्या कर्जाची माहिती वार्षिक सर्वसाधारण सभेसमोर सादर करणे आवश्यक असते. सदरची माहिती वार्षिक अहवालात नमूद केली आहे.
आपल्या बँकेच्या संचालकांनी व त्यांच्या नातेवाईकांनी विमा पॉलिसी अथवा स्वतःच्या मुदत ठेवींच्या तारणावर कर्ज घेतलेले नाही. परंतू त्यांच्या नातेवाईकांनी घेतलेल्या कर्जाबाबतचा तपशील अहवाल नमूद केला आहे. तरी याविषयी पुढील ठराव सभेपुढे मांडत आहोत.
**ठराव क्रमांक 10 –** दि. 31 मार्च 2022 अखेर संचालकांना व त्यांच्या कुटुंबियांना (त्यांच्या स्वतःच्या मुदत ठेवींच्या तारणावर) दिलेल्या कर्जाची, तसेच सदर व्यक्तींना अन्य कुठलेही कर्ज दिले गेले नसल्याची ही सभा नोंद घेत आहे.
सूचक – श्री. प्रभाकर आकाराम पवार (सभासद क्र. 43574)
अनुमोदक – श्री. महेश बाळकृष्ण दुगाडे (सभासद क्र. 89349)

ठराव एकमताने मंजूर

मा.संचालक श्री. फणसे यांनी पुढील विषय सभेपुढे मांडला.
विषय क्रमांक 11- 2023-24 या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षक नेमण्याचे व त्यांचे सेवाशुल्क ठरविण्याचे वार्षिक सर्वसाधारण सभेचे अधिकार संचालक मंडळास देणे.

याबाबत माहिती देताना श्री. फणसे यांनी सांगितले की, बहुराज्यीय सहकारी कायदा, 2002 कलम 70(2) प्रमाणे वैधानिक लेखापरीक्षक नेमण्याचे व कलम 70(b) प्रमाणे त्यांचे शुल्क निश्चित करण्याचे अधिकार सर्वसाधारण सभेस आहेत. त्याचप्रमाणे, बँकिंग नियमन कायद्यात झालेल्या बदलांप्रमाणे वैधानिक लेखापरीक्षक नेमण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेची अनुमती

मिळणेही आवश्यक झाले आहे. त्याअनुषंगाने आर्थिक वर्ष 2022-23 साठी बँकेकरीता वैधानिक लेखापरिक्षकांच्या नियुक्तीकरीता भारतीय रिझर्व्ह बँकेकडे शिफारस करण्याचे अधिकार बँकेच्या दि. 30 सप्टेंबर 2021 रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेने संचालक मंडळास दिले होते. त्यानुसार सध्याचे वैधानिक लेखापरिक्षक (मे. पी.जी. भागवत एल.एल.पी.) यांच्या 2022-23 करीताच्या नियुक्तीसाठीची परवानगी रिझर्व्ह बँकेकडून प्राप्त झाली आहे. त्यादृष्टीने पुढील आर्थिक वर्षासाठी (2023-24) वैधानिक लेखापरिक्षकांच्या नियुक्तीकरीता रिझर्व्ह बँकेकडे शिफारस करण्याचे अधिकार संचालक मंडळास द्यावेत असा ठरावही यावेळी प्रस्तावित आहे. प्रमाणित लेखापरीक्षकांच्या यादीतून ही निवड करावयाची असते. त्या यादीतील सक्षम लेखापरीक्षकांची निवड आपण करीत असल्याची माहिती त्यांनी सभेस दिली. याविषयी त्यांनी पुढील ठराव सभेपुढे सादर केला.

**ठराव क्रमांक 11-**

दि. 30 सप्टेंबर 2021 रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेने संचालक मंडळास दिलेल्या अधिकारांप्रमाणे आर्थिक वर्ष2022-23 साठी वैधानिक लेखापरिक्षक म्हणून नियुक्ती केलेल्या मे. पी. जी. भागवत एलएलपी यांच्या नियुक्तीची अनुमती रिझर्व्ह बँकेकडून प्राप्त झाली आहे. आर्थिक वर्ष 2023-24 साठी वैधानिक लेखापरिक्षक नेमण्याचे व त्यांचे शुल्क निश्चित करण्याचे तसेच त्यांचेबाबत रिझर्व्ह बँकेकडे शिफारसी करण्याचे वार्षिक सभेचे अधिकार ही वार्षिक सर्वसाधारण सभा संचालक मंडळास देत आहे.

सूचक – श्री. चंद्रकांत मारुती भोसले (सभासद क्र. 66221)
अनुमोदक – श्री. आनंद म. पाध्ये (सभासद क्र. 85798)

ठराव एकमताने मंजूर

मा. संचालक श्री. आरोलकर यांनी सभेपुढे सादर केला.

**विषय क्रमांक 12-** बँकेचे निधी / तरतुदी (Reserces/ Provisions) अन्य आवश्यक अशा खात्यांमध्ये वा नफा-तोटा खात्यांमध्ये वर्ग करण्याचे अधिकार संचालक मंडळास देणे.

**ठराव क्रमांक 12 –**

बहुराज्यीय सहकारी कायदा, भारतीय रिझर्व्ह बँकेचे निर्देश, बँकेच्या उपविधीतील कलम 42 यांच्या अधीन राहून, यापुढेही बँकेचे निधी/तरतुदी अन्य आवश्यक अशा खात्यांमध्ये वा नफा-तोटा खात्याकडे वर्ग करण्याचे अधिकार दि. 24-09-2022 रोजीची ही वार्षिक सर्वसाधारण सभा, संचालक मंडळास देत आहे.

बहुराज्यीय सहकारी कायदा, बँकेच्या उपविधीतील कलम 42 व भारतीय रिझर्व्ह बँकेच्या अनुमतीस अधीन राहून, बँकेच्या खालील निधी / तरतुदी अन्य आवश्यक अशा खात्यांमध्ये वर्ग करण्याचे अधिकार दि. 24-09-2022 रोजीची ही वार्षिक सर्वसाधारण सभा, संचालक मंडळास देत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| सामान्य मुक्त गंगाजळी **(General Free Reserve)** | - | ₹ | **88,10,000/-** |
| संभाव्य नुकसानीसाठी तरतूद **(Reserve for Contingency)** | - | ₹ | **6,50,00,000/-** |

सूचक – श्री. सुधीर भागवत जोशी (सभासद क्र. 116841)
अनुमोदक – श्री. जयतीर्थ कुलकर्णी (सभासद क्र. 57378)
ठराव एकमताने मंजूर

पुढील विषय मा. संचालक श्री. कर्वे यांनी सभेपुढे सादर केला.

**विषय क्रमांक 13 –** आर्थिक वर्ष 2021-22 मध्ये सवलत देऊन बंद केलेल्या खात्यांबाबतच्या सांख्यिकीय माहितीची नोंद घेणे.

याबाबतची माहिती मा. संचालक श्री. कर्वे यांनी सभेस दिली व पुढील ठराव सभेपुढे सादर केला.

**ठराव क्रमांक 13-**

बँकेद्वारा आतापर्यंत निर्लेखन केलेल्या कर्ज खात्यामधून 2021-22 या आर्थिक वर्षात सवलत देऊन एकूण 96 कर्ज खाती बंद करण्यात आली. या कर्ज खात्यांमधून मुद्दल ₹ 411.50 लाख येणे बाकी होते. त्यातून पूर्ण रक्कम ₹ 388.50 लाख वसूल करण्यात आली व मुद्दल रकमेत ₹ 23.00 लाख या रकमेची सवलत संबंधित निर्लेखित कर्ज खातेदारांना देण्यात आली.

तसेच वरील 96 कर्ज खात्यात ₹ 401.48 लाख व्याजापोटी येणे बाकी होते. जे उत्पन्नात धरले नव्हते, त्यातून रक्कम ₹ 117.72 लाख वसूल करण्यात आली व ₹ 283.76 लाख या रकमेची सवलत संबंधित निर्लेखित कर्ज खातेदारांना देण्यात आली. ही वार्षिक सर्वसाधारण सभा या कार्यवाहीस मंजूरी देत आहे. निर्लेखित न केलेल्या 20 थकित कर्ज खात्यांमधून मुद्दल ₹ 95.49 लाख व व्याज ₹ 11.61 लाख असे एकूण ₹ 107.10 लाख येणे बाकी होते. त्यातून रक्कम ₹ 102.17 लाख वसूल करण्यात आली. मुद्दल रकमेत कोणतीही सवलत देण्यात आली नाही, तर ₹ 4.93 लाख या व्याज रकमेची सवलत संबंधित कर्ज खातेदारांना देण्यात आली. ही वार्षिक सर्वसाधारण सभा या कार्यवाहीस मंजूरी देत आहे.

सूचक – श्री. नारायण रामराव ढवळे (सभासद क्र. 2277)
अनुमोदक – श्री. दत्तात्रय वामन वाघे (सभासद क्र. 55218)
ठराव एकमताने मंजूर

सभेसमोर अन्य कोणतेही विषय नसल्याने मा. अध्यक्षांनी सभा संपल्याची घोषणा केली.

-0-0-0-0-